# प्रकरण : २ - वर्णविचार

घटक :-

१). वर्ण म्हणजे काय ?
२). मराठीची वर्णमाला
३). बाराखडी
४). वर्णांचे प्रकार
अ). स्वरूपानुसार प्रकार - ४
ब). उच्चारानुसार प्रकार - ९
५). अकारविल्हे

२). **मराठीची वर्णमाला :-** (मूळाक्षरे / अक्षरे / मूळध्वनी)
वर्णांच्या क्रमबद्ध मालिकेला मराठीची वर्णमाला असे म्हणतात.

स्वर - (१४)

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ऌ, ए, अॅ, ऐ, ओ, ऑ, औ

स्वरादी - (२)
ं - अनुस्वार
ः - विसर्ग

व्यंजने - (३४)

क् ख् ग् घ् ङ्
च् छ् ज् झ् ञ्
ट् ठ् ड् ढ् ण्
त् थ् द् ध् न्
प् फ् ब् भ् म्
य् र् ल् व्
श् ष् स्
ह् ळ्

विशेष संयुक्त व्यंजने - (२)
क्ष्, ज्ञ्

३). सोळाखडी :-

व्यंजनात स्वर व स्वरादी यांची चिन्हे मिळून आपण सोळाखडी तयार करतो. व्यंजनामध्ये स्वर व स्वरादी यांची चिन्हे मिळवून, आपण सोळा अक्षरे तयार करतो याला सोळाखडी असे म्हणतात.

| वर्ण | अ | आ | इ | ई | उ | ऊ | ऋ | ऌ | ए | ॲ | ऐ | ओ | ऑ | औ | अं | अः |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चिन्हे | | ा | ि | ी | ु | ू | ृ | ॢ | े | ॅ | ै | ो | ॉ | ौ | ं | ः |
| सोळाखडी | क | का | कि | की | कु | कू | कृ | कॢ | के | कॅ | कै | को | कॉ | कौ | कं | कः |

४). वर्णाचे प्रकार :-

अ). स्वरूपानुसार प्रकार -
१). स्वर
२). स्वरादी
३). व्यंजने
४). विशेष संयुक्त व्यंजने

ब). उच्चारस्थानानुसार प्रकार -
१). कंठ्य वर्ण
२). तालव्य वर्ण
३). मूर्धन्य वर्ण
४). दंत्य वर्ण
५). ओष्ठ्य वर्ण
६). कंठतालव्य वर्ण
७). कंठोष्ठ्य
८). दंतोष्ठ्य
९). दंततालव्य

स्वरूपावरून प्रकार - (४)

१) स्वर :-

## स्वर म्हणजे काय ?

ओठांचा एकमेकांशी किंवा जिभेचा मुखातील कोणत्याही अवयवांना स्पर्श न होता आपल्या तोंडावाटे जे ध्वनी बाहेर पडतात त्यांना 'स्वर' म्हणतात.

स्वर हा शब्द स्वृ यापासून तयार झाला असून त्याचा अर्थ ध्वनी करणे किंवा उच्चार करणे असा होतो.

उदा., पुढील १४ वर्ण स्वर आहेत.

अ, आ, इ, ई, उ, ऊ, ऋ, ऌ, ए, अॅ, ऐ, ओ, ऑ, औ

## स्वरांचे वैशिष्ट्ये :-

- स्वर हे पूर्णोच्चारित स्वर आहेत.
- स्वरांचा उच्चार स्वतंत्रपणे होतो म्हणजेच इतर वर्णाच्या सहाय्यावाचून होतो.
- स्वराला संस्कृतमध्ये 'अच' असे म्हणतात.
- स्वरांचा उच्चार करताना आपले तोंड उघडे व विवृत्त (पसरलेले) असते म्हणून स्वराला विस्तृत असेही म्हणतात.
- स्वरोच्चाराच्या वेळी हवेचा मार्ग अडवलेला नसतो. म्हणजेच हवेचा मार्ग मोकळा आहे.
- स्वर म्हणजे नुसते सूर
- स्वर हे अक्षरे आहे. ध्वनी चिन्हे आहेत.
- स्वर हे स्वावलंबी वर्ण आहेत.

## स्वरांचे प्रकार :-

स्वरांचे प्रकार

- ऱ्हस्व स्वर
- दीर्घ स्वर
- संयुक्त स्वर
- आदेश स्वर

1). ऱ्हस्व स्वर :-

ज्या स्वरांचा उच्चार आखूड होतो म्हणजेच उच्चार करण्यास कमी वेळ लागतो त्यांना ऱ्हस्व स्वर म्हणतात. पुढील पाच स्वर ऱ्हस्व स्वर आहेत

उदा., अ, इ, उ, ऋ, ऌ

ऱ्हस्व स्वरांना सिद्ध / मूळ स्वर असेही म्हणतात.

2). दीर्घ स्वर :-

ज्या स्वरांचा उच्चार लांबट होतो म्हणजेच उच्चार करण्यास अधिक वेळ लागतो त्यांना दीर्घ स्वर असे म्हणतात पुढील तीन स्वर दीर्घ स्वर आहेत.

उदा., आ, ई, ऊ

टीप:- दीर्घ स्वरांना द्विगुणीत, साधित / तद्भुपन्न स्वर असेही ~~संयुक्त स्वर :-~~ म्हणतात.

अ+अ = आ , इ+इ = ई (द्विगुणीत म्हणजे दुप्पट)

3). संयुक्त स्वर :-

दोन स्वर (विजातीय) एकत्र येऊन बनलेल्या स्वरांना संयुक्त स्वर असे म्हणतात. खालील चार स्वर संयुक्त स्वर आहेत.

उदा., ए = अ + इ / ई

ऐ = आ + इ / ई

ओ = अ + उ / ऊ

औ = आ + उ / ऊ.

टीप:- संयुक्त स्वरांना साधित, तद्भुपन्न / दीर्घ स्वर असेही म्हणतात.

4). आदत्त स्वर :-

इंग्रजीभाषेतून मराठीत आणआलेल्या पुढील दोन स्वरांना आदत्त स्वर असे म्हणतात.

आदत्त या स्वरांनाच नवे स्वर किंवा इंग्रजी स्वर असे म्हणतात.

उदा., ॲ, ऑ.

प्रा. अरविंद मंगरुळकर यांनी ॲ, ऑ यांना मराठी वर्णमालेत स्थान दिले होते. मो. रा. वाळंबे यांनी ॲ, ऑ यांना नवे स्वरादी असे म्हटले आहे. परंतू शासननिर्णयानुसार ॲ, ऑ यांचा वर्णमालेमध्ये स्वर म्हणूनच समावेश केलेला आहे. ॲ, ऑ या दोन स्वरांचा वापर इंग्रजी शब्दापुरताच मर्यादित आहे.
उदा., फॅशन, ऑफिस, हॉस्पिटल, बॅग, कॉलेज इत्यादी

## सजातीय स्वर :-

एकाच उच्चारस्थानातून निर्माण होणाऱ्या स्वरांना सजातीय स्वर असे म्हणतात.
उदा., अ-आ, इ-ई, उ-ऊ.

## अवर्ण / असवर्ण / विजातीय स्वर :-

भिन्न उच्चार स्थानातून निर्माण होणाऱ्या स्वरांना विजातीय स्वर असे म्हणतात.
उदा., अ-इ, ए-ऐ, अ-उ.

## स्वरांचे प्रकार :-

① स्वरूपानुसार प्रकार
- ऱ्हस्व स्वर
- दीर्घ स्वर
- संयुक्त स्वर
- अर्धता स्वर

② उच्चारस्थानानुसार प्रकार
- सजातीय स्वर
- विजातीय स्वर

③ उत्पत्तीवरून प्रकार
- सिद्ध (ऱ्हस्व / मूळ) — अ, इ, उ, ऋ, ऌ
- साधित (तदुत्पन्न)
  - दीर्घ — आ, ई, ऊ
  - संयुक्त — ए, ऐ, ओ, औ

सजातीय + सजातीय = दीर्घ स्वर
विजातीय + विजातीय = संयुक्त स्वर

Page No. :
Date : / /

२). स्वरादी :- (स्वर + आदी)
ज्या वर्णाचा उच्चार करण्याआधी स्वर येतो त्या वर्णाला स्वरादी असे म्हणतात.
स्वरादी म्हणजे स्वर आहे आदी म्हणजे आरंभ ज्याच्या अशा वर्ण
उदा., ं, ः हे दोन स्वरादी असून त्यांचा उच्चार करण्याअगोदर पुढीलप्रमाणे स्वर आलेला दिसतो.

१). अंगण = अ + अनुस्वार
२). शंकर = श् + अ + अनुस्वार
३). दुःख = द् + उ + विसर्ग
४). मनःस्थिती = न् + अ + विसर्ग

स्वरादीचे प्रकार (उच्चार) :- २

१). अनुस्वार :- (ं)
ज्या वर्णाचा उच्चार स्पष्ट, खणखणीत आणि नाकातून होतो त्या वर्णाला अनुस्वार असे म्हणतात.
उदा., तंटा, घंटा, अलंकार, निबंध, डाळिंब, चिंच, भिंत, चंपा इ.
अनुस्वार या शब्दाची फोड अनु + स्वार अशी होते. अनु म्हणजे पाठीमागून आलेला किंवा नंतरचा. स्वार म्हणजे आरूढ होऊन बसणे म्हणून (अनुस्वार हा कोणत्यातरी वर्णाचा उच्चार केल्यानंतर उच्चारला जातो किंवा अनुस्वार हा कोणत्यातरी वर्णावर आरूढ होतो / बसतो)
उदा., पतंग या शब्दातील त या अक्षरावर अनुस्वार हा आरूढ झालेला आहे.

२). विसर्ग :- (ः)
विसर्ग याचा अर्थ श्वास सोडणे असा होतो. विसर्गाचा उच्चार ह सारखा होतो. विसर्ग वर्णमालेमध्ये या 'ः' चिन्हाने दाखवतात. याच्या अगोदर ऱ्हस्व स्वर व नंतर कठोर वर्ण येत असतो.

३). व्यंजन (परवर्ण) स्वरान्त / हलन्त / संवृत्त वर्ण ):-

ज्या वर्णांचा उच्चार इतर वर्णांच्या सहाय्याने होत नाही. त्या वर्णाला 'व्यंजन' असे म्हणतात. ओठांचा एकमेकांशी किंवा जिभेचा मुखातील विविध अवयवांना स्पर्श होऊन वर्ण व्यंजनांचा उच्चार होतो. त्यांना 'व्यंजने' म्हणतात. व्यंजनाचा पूर्ण उच्चार करण्यासाठी दुसऱ्या वर्णाची म्हणजे परवर्णाची मदत घेतली जाते म्हणून व्यंजनाला परवर्ण म्हणतात. दुसऱ्या वर्णाची म्हणजे स्वरांची मदत घेतल्यानंतर हा स्वर शेवटी येतो. म्हणून व्यंजनांना 'स्वरान्त' असे म्हणतात.

व्यंजने ही अपूर्ण उच्चाराची आहेत म्हणून ती हल चिन्हाने दाखवतो.

व्यंजनाचा हल चिन्हाने शेवट होत असल्याने त्यांना 'हलन्त' असे म्हणतात.

व्यंजनाचा उच्चार करताना आपले तोंड काहीसे बंद असते म्हणून व्यंजनांना 'संवृत्त वर्ण' असे म्हणतात.

व्यंजनाला संस्कृतमध्ये हल म्हणतात.

उदा., क्, ख् पासून ते ह्, ळ् पर्यंतचे (३४ वर्ण) आहेत.

☆ व्यंजनाचे प्रकार :-

व्यंजनाचे प्रकार
- स्पर्श व्यंजने
  - कठोर व्यंजने
  - मृदू व्यंजने
  - अनुनासिके
- अर्धस्वर व्यंजने
- ऊष्मे व्यंजने
- महाप्राण व्यंजने
- स्वतंत्र व्यंजने

१). स्पर्श व्यंजने :-

आपल्या मुखातून निघणारी हवा बाहेर पडताना आपली जीभ कंठ्य, तालू, मृदू, दंततालू इत्यादी अवयवांना

स्पर्श करुन बाहेर पडते तेव्हा, ज्या वर्णाचा उच्चार होतो तेव्हा त्याला 'स्पर्श व्यंजने' म्हणतात.

उदा., क, ख पासून ते भ, म (25 वर्ण) पर्यंत

| कठोर | | मृदु | | अनुनासिके |
|---|---|---|---|---|
| क | ख | ग | घ | ङ |
| च | छ | ज | झ | ञ |
| ट | ठ | ड | ढ | ण |
| त | थ | द | ध | न |
| प | फ | ब | भ | म |

स्पर्श व्यंजनाचे उपप्रकार :-

1. कठोर व्यंजने :- ज्या वर्णाचा उच्चार कठीण असतो त्यास कठोर व्यंजने म्हणतात.
2. मृदू व्यंजने :- ज्या वर्णाचा उच्चार कोमल / सौम्य / मृदु असतो त्यास मृदू व्यंजने म्हणतात.
3. अनुनासिके :- ज्या वर्णाचा उच्चार अस्पष्ट, ओझरता व त्या त्या उच्चारस्थानाबरोबरच नाकातुन होतो त्यास मृदू व्यंजने म्हणतात.

| | कठोर वर्ण (श्वास / अघोष) | मृदू वर्ण (नाद / घोष / संघोष) |
|---|---|---|
| 34 व्यंजनापैकी | 13 | 21 |
| 52 वर्णापैकी | 14 | 38 |
| | क ख | ग, घ ङ. |
| | च छ | ज झ ञ |
| | ट ठ | ड ढ ण |
| | त थ | द ध न |
| | प फ | ब भ म |
| | श ष स | य र ल व |
| | क्ष | ह ळ |
| | | ज्ञ |

अनुनासिके ही स्पर्श व्यंजने गटात पाचव्या गटात येत असल्यामुळे त्यांना पंचम वर्ण म्हणतात.

उदा., ङ
ञ
ण
न
म

अनुस्वाराऐवजी अनुनासिके वापरल्यास अनुनासिकांना परसवर्ण असे म्हणतात.

अनुस्वाराऐवजी अनुनासिके वापरताना तीन नियम लक्षात घ्यावे.

1. तो शब्द तत्सम असावा
2. अनुस्वारानंतर येणारा वर्ण हा स्पर्श व्यंजन गटातील असावा.
3. अनुस्वारानंतर येणाऱ्याच वर्णाच्यात वर्गातील पाचव्या स्थानचे अनुनासिक अनुस्वारानंतर येणाऱ्या वर्णाला जोडावे.

उदा., 1. गंगा > गङ्गा
2. पंच > पञ्च
3. घंटा > घण्टा
4. संत > सन्त
5. चंपक > चम्पक

टीप :-

एका शब्दात दोन अनुस्वार आल्यास वरील नियमाप्रमाणे अनुनासिके घ्यावीत.

उदा., 1. संबंध - सम्बन्ध.

अनुस्वाराच्या नंतर य, र, ल, व, श, ष, स, ह हे वर्ण आल्यास 2009 च्या नियमानुसार अनुस्वाराऐवजी शीर्षबिंदू (अनुस्वार) घ्यावा.

Page No. :
Date : / /

उदा.,
१). संबंध - संबंध
२). संरक्षण - संरक्षण
३). संलग्न - संलग्न
४). संवाद - संवाद
५). संशय - संशय
६). दंष्ट्रा - दंष्ट्रा
७). सिंह - सिंह
८). संसार - संसार

२). अर्धस्वर / अंतःस्थ / ईषत विवृत्त :-

य्, ल्, र्, व् यांची उच्चारस्थाने अनुक्रमे इ, ऌ, ऋ, उ य स्वरांच्या उच्चारस्थानांसारखे असल्याने या दोघांचा जवळचा संबंध आहे. निकटवर्तीय नाते आहे म्हणून त्यांना अर्धस्वर असे म्हणतात.
उदा., य्, र्, ल्, व् हे चार वर्ण अर्धस्वर आहेत.

संधी होताना वरील व्यंजने व स्वर हे एकमेकांच्या जागी येतात.
उदा.,

| पोटशब्द | एकत्र येणारे वर्ण | जोडशब्द |
| --- | --- | --- |
| प्रीति+ अर्थ | इ + अ = य् + अ = य | प्रीत्यर्थ |
| पितृ + अर्थ | ऋ + अ = र् + अ = र | पित्रर्थ |
| ऌ + आकृती | ऌ + आ = ल् + आ = आ | आकृती |
| सु + अल्प | उ + अ = व् + अ = व | स्वल्प |

स्फोटक वर्ण :- क, ट, त, प्, ग्, ड, द्, ब (८)

अर्धस्फोटक वर्ण :- च्, छ्, ज्, झ्, थ्, फ, ग्, ब्, भ्, ढ्, ध्, म्.

VEDHA
Page No. :
Date : / /

अर्धस्वर हे स्पर्श व्यंजने व ऊष्मे व्यंजने या दोघांच्या मध्ये येत असलेल्या स्वरांना अंत:स्थ वर्ण म्हणतात.

अर्धस्वरांना मो. के. दामले यांनी ईषत विवृत्त असे म्हटले आहे.

ईषत म्हणजे जराजे, विवृत्त म्हणजे विसरलेले.

अर्धस्वरांचा उच्चार करत असताना आपले मुख किंचीत उघडे असते.

3). ऊष्मे / घर्षक / ईषत / पृष्ठ (श, ष, स)

श, ष, स यांचा उच्चार करताना वायूच्या घर्षणाने उष्णता निर्माण होते. त्यांना ऊष्मे किंवा घर्षक वर्ण असे म्हणतात.
ऊष्मे वर्णांचा उच्चार करताना आपले मुख जरासे बंद असते म्हणून त्यांना मो. के. दामले यांनी ईषत पृष्ठ असे म्हटले आहे.
श, ष, स यांचा समावेश कठोर वर्ण व महाप्राण वर्ण यामध्ये होतो.
टीप-1 :- र, ल, ळ यांना द्रव वर्ण असेही म्हणतात. कारण यांच्या उच्चारात नादयुक्त श्वास प्रवाही असतो.
टीप-2 :- र या वर्णाला कंपीत वर्ण असेही म्हणतात. कारण र चा उच्चार करताना आपल्या जिभेचे कंपन होते. जीभ हादरते.

4). महाप्राण वर्ण :- (ह)

ह या वर्णाचा उच्चार करताना फुफ्फुसातून निघणारी हवा आपल्या मुखादूवारे जोरात बाहेर फेकली जाते म्हणून ह या वर्णास महाप्राण वर्ण असे म्हणतात.

उदा., मोठा, प्राण, श्वास.

Page No. :
Date : / /

ज्या वर्णात ह् ची छटा असते त्या वर्णास महाप्राण वर्ण असे म्हणतात. ह् हा एक वर्ण श्, ष्, स् हे तीन वर्ण आणि खालीलप्रमाणे ह् ची छटा असलेले १० वर्ण असे एकूण १४ वर्ण महाप्राण वर्ण म्हणून ओळखले जातात.

| | अल्पप्राण | महाप्राण | अल्पप्राण | महाप्राण |
|---|---|---|---|---|
| ① | क् | ख् (क्+ह्) | ग् | घ् (ग्+ह्) |
| ② | च् | छ् (च्+ह्) | ज् | झ् (ज्+ह्) |
| ③ | ट् | ठ् (ट्+ह्) | ड् | ढ् (ड्+ह्) |
| ④ | त् | थ् (त्+ह्) | द् | ध् (द्+ह्) |
| ⑤ | प् | फ् (प्+ह्) | ब् | भ् (ब्+ह्) |

टीप-१:- प्रा. अरविंद मंगळूरकर यांनी महाप्राण वर्ण मानण्यास विरोध दर्शविला आहे.

टीप-२:- मराठीतील वर्णांचे इंग्रजीत स्पेलिंग काही वर्णात H चा वापर करतो. अशा H मिसळून तयार होणाऱ्या वर्णास ही महाप्राण वर्ण असे म्हणतात.

| अल्पप्राण | महाप्राण | अल्पप्राण | महाप्राण |
|---|---|---|---|
| क् | ख् (क्+ह्) | ग् | घ् (ग्+ह्) |
| k | kh | g | gh |
| च् | छ् (च्+ह्) | ज् | झ् (ज्+ह्) |
| ch | chh | J | Jh |
| ट् | ठ् (ट्+ह्) | ड् | ढ् (ड्+ह्) |
| T | Th | d | dh |
| त् | थ् (त्+ह्) | द् | ध् (द्+ह्) |
| p | PH | B | dH |
| प् | फ् (प्+ह्) | ब् | भ् (ब्+ह्) |
| P | Ph | B | Bh |

अल्पप्राण :-

ज्यात ह ची छटा नसते त्या वर्णांस अल्पप्राण वर्ण असे म्हणतात. आपल्या मुखावाटे छोड्याश्या प्रमाणात हवा बाहेर पडताना जे वर्ण उच्चारले जातात त्या वर्णांना अल्पप्राण वर्ण असे म्हणतात.
वरील तक्त्यांतील १० वर्ण य, र, ल, व हे चार वर्ण अर्धस्वर व ळ हा स्वतंत्र वर्ण असे एकूण २० अल्पप्राण वर्ण म्हणून ओळखले जातात.

५). स्वतंत्र वर्ण :-

ळ हा मराठी वर्णमालेतील स्वतंत्र वर्ण आहे. ळ हा द्रविड भाषेतून मराठीत आल्याने त्यास द्राविडीयन वर्ण असेही म्हणतात. ळ हा द्राविड वर्ण. द्राविड भाषा कुळातील ट, ठ यांना कठोर वर्ण ड, ढ यांना मृदू वर्ण आणि ण चा अनुनासिकात समावेश केला व ळ ला स्वतंत्र वर्ण म्हणून ओळखले जाऊ लागले.

६). विशेष संयुक्त व्यंजने :-

क्ष व ज्ञ यांना विशेष संयुक्त व्यंजने असे म्हणतात.
६ नोव्हेंबर २००९ च्या महाराष्ट्र शासन निर्णयामध्ये म्हटले आहे की, "क्ष आणि ज्ञ हे देवनागरी वर्णमालेतील परंपरेने चालत आलेले विशेष लेखन चिन्हाकार आहेत. वास्तविक ती जोडाक्षरे आहेत. म्हणून त्यांचा मराठीच्या वर्णमालेमध्ये विशेष संयुक्त व्यंजने म्हणून त्यांचा निर्देश करण्यात आला आहे."
उदा., क्ष = क् + ष
ज्ञ = द् + न + य

टीप :- महादेव पांडुरंग सबनीस यांनी क्ष व ज्ञ यांना मराठी वर्णमालेत स्थान दिले आहे.

## उच्चारस्थानानुसार वर्णांचे वर्गीकरण :-

1. जीभ
2. पडजीभ
3. कंठ्यवर्ण
4. मूर्धा
5. तालू
6. दंत्यतालू
7. ओष्ठ्य (ओठ)
8. दंत्य (दात)
9. नाक
10. नासिका

| | वर्ण ओळखण्यासाठी क्लृप्ती | स्वर | व्यंजने | मुखाचा भाग | वर्णांचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| 1) | अ, क, ह | अ, आ | क, ख, ग, घ, ङ, ह, : | कंठ | कंठ्यवर्ण |
| 2) | इ, च, य | इ, ई | च, छ, ज, झ, ञ, य, श | तालू | तालव्य वर्ण |
| 3) | ऋ, ट, र | ऋ | ट, ठ, ड, ढ, ण, र, ष, ळ | मूर्धा | मूर्धन्य वर्ण |
| 4) | लृ, त, ल | लृ | त, थ, द, ध, न, ल, स | दंत | दंत्य वर्ण |
| 5) | उ, प, मा | उ, ऊ | प, फ, ब, भ, म | ओष्ठ्य | ओष्ठ्य वर्ण |
| 6) | - | ए, ऐ | - | कंठ + तालू | कंठतालव्य वर्ण |
| 7) | - | ओ, औ | - | कंठ + ओष्ठ | कंठोष्ठ्य वर्ण |
| 8) | - | - | व | दंत + ओष्ठ | दंतोष्ठ्य वर्ण |
| 9) | - | - | च, छ, ज, झ | दंत + तालू | दंततालव्य वर्ण |
| 10) | - | ं | अं | नासिका | नासिक्य वर्ण |

## ★ उच्चारस्थानानुसार प्रकार :-

ध्वनीचा उच्चार करताना आपल्या तोंडातील ज्या भागाचा अधिक उपयोग होतो त्या भागाचे नाव त्या त्या ध्वनीला म्हणजे वर्णाला देण्यात आलेले आहे.
उदा :- प् या ध्वनीचा उच्चार करताना ओठाचा उपयोग होतो म्हणून प् हे ओष्ठ वर्ण आहे.

### 1. कंठ्य वर्ण :-

जीभेचा मागील भाग वर उचलून पडजीभेच्या वरच्या भागाला म्हणजे कंठाला स्पर्श करताना ज्या वर्णाचा उच्चार होतो त्या वर्णास कंठातून निघणारे म्हणून कंठ्य वर्ण असे म्हणतात.
उदा., अ, आ हे दोन स्वर विसर्ग हा एक वर्ण आणि ग्, घ्, ङ्. ही ६ व्यंजने असे एकूण ९ वर्ण कंठ्य वर्ण आहेत.

### 2. तालव्य वर्ण :-

वरच्या दाताच्या मागच्या बाजूच्या भागापासून ते पडजीभेच्या वर कंठापर्यंत जो घुमटाकार भाग आहे त्याला तालू असे म्हणतात. पडजीभेच्या जवळील तालूच्या मागच्या भागाला कोमल तालू असे म्हणतात. कोमल तालूलाच कंठ असे म्हणतात. तालूच्या पुढचा जो भाग आहे त्याला कठोर तालू असे म्हणतात. कठोर तालूलाच तालू असेही म्हणतात. जीभेचे पाते तालूला लागून ज्या वर्णाचा उच्चार होतो त्या वर्णाला तालव्य वर्ण असे म्हणतात. जिथे आपण चिंच चघळतो ती जागा म्हणजे तालू होय.
उदा., इ, ई हे २ स्वर, च्, छ्, ज्, झ्, ञ्, य्, श् ही ७ व्यंजने असे एकूण ९ तालव्य वर्ण आहेत.

### 3. मूर्धा / मूर्धन्य वर्ण :-

कोमल तालू व कठोर तालू किंवा कंठ तालू या मधल्या जागेला मूर्धा वर्ण म्हणतात. आपल्या जीभेचा शेंडा मूर्धेला भिडल्यानंतर ज्या वर्णाचा उच्चार होतो त्यांना मूर्धन्य वर्ण असे

म्हणतात.
उदा., ऋ हा स्वर आणि ट, ठ, ड, ढ, ण, ष व ळ ही ८ व्यंजने असे एकूण ९ मूर्धन्य वर्ण आहेत.

४). दंत्य वर्ण :-
वरच्या दाताच्या बाजूस जीभेचा स्पर्श झाल्याच्या नंतर ज्या वर्णाचा उच्चार होतो त्या वर्णास दंत्य वर्ण असे म्हणतात. दंत्य म्हणजे दात.
उदा., लृ हा स्वर आणि त, थ, द, ध, न, ल, स ही ७ व्यंजने असे एकूण ८ वर्ण दंत्य वर्ण आहेत.

५). ओष्ठ्य वर्ण :-
ओष्ठ्य म्हणजे ओठ खालच्या व वरच्या ओठांचा समवेश करुन ज्या वर्णाचा उच्चार होतो त्या वर्णास ओष्ठ्य वर्ण असे म्हणतात.
उदा., इ, ई, उ, ऊ, प, फ, ब, भ, म असे ५ वर्ण आहेत.

६). कंठ्य तालव्य वर्ण :-
कंठ्य आणि तालू यांच्या उपयोगातून उच्चारलेल्या वर्णांना कंठ्य तालव्य वर्ण असे म्हणतात.
उदा., ए, ऐ हे २ स्वर आहेत.

७). कंठौष्ठ्य वर्ण :-
कंठ्य आणि ओठ यांच्या उपयोगातून उच्चारलेले ध्वनी हे कंठौष्ठ्य वर्ण आहेत.
उदा., ओ, औ हे २ स्वर कंठौष्ठ्य वर्ण आहेत.

८). दंतौष्ठ्य वर्ण :-
दात + ओठ यांच्या उपयोगातून व हा वर्ण उच्चारला जातो ९ दंत्य तालव्य वर्ण. तालूच्या पुढील जो कुणीर व खरबरीत असा जो भाग आहे त्याला दंत तालू किंवा वर्त्स म्हणतात. तालू व वरचे दात यांमधील भाग म्हणजे दंत तालू.

येथे उच्चारलेल्या वर्णाला दंत्य तालव्य वर्ण किंवा दंतौष्ठ्य वर्ण म्हणतात.
उदा., च, छ, ज, झ.

टिप १ :- ॲ चे उच्चारस्थान कंठ्य तालू वर तर ऑ चे उच्चारस्थान कंठ्य ओठ आहे म्हणून या वर्णास अनुक्रमे (ॲ) आणि कंठौष्ठ्य (ऑ)
टिप २ :- अनुस्वाराचे उच्चारस्थान नाक आहे म्हणून त्याला नासिक्य वर्ण म्हणतात.

| तालव्य उच्चार | दंत्य तालव्य उच्चार |
|---|---|
| 'य'ने उच्चार युक्त | 'अ' लावून उच्चार |
| जग (ज्यग) - सृष्टी<br>जप (ज्यप) - देवाचे नाव घेणे<br>जश (ज्यश) - म्हातारपणा<br>चाप (च्याप) - धनुष्य | जग (जग) - जिवंत रहा<br>जप (जप) - काळजी घेणे<br>जश (जश) - थोडे<br>चाप (चाप) - चिमटा |

☆ आकारविल्हे / वर्णानुक्रम :-
आकार म्हणजे अ हा वर्ण विल्हे म्हणजे क्रम. म्हणून आकारविल्हे म्हणजे अ या अक्षरापासून लावलेला क्रम.

१) पुढील शब्दांचा आकारविल्हेनुसार क्रम लावा.

अण्णा, आई, बाबा, माय
→ अण्णा, आई, बाबा, माय

Page No. :
Date : / /

२). पुढील शब्दांचा आकारविल्हेनुसार क्रम लावा.

कठोर , कंठ , काठ
कठोर = क् + अ + ठ् + ओ + ----
कंठ = क् + अ + ं + ---
काठ = क् + आ + ठ् + ---
→ कंठ , कठोर , काठ.

३). पुढील शब्दांचा आकारविल्हेनुसार क्रम लावा.

क्रम , किंचीत , क्वचित

क्रम = क् + र् + अ + --
किंचित = क् + इ + ं + ----
क्वचित = क् + व् + अ + ---

→ किंचित , क्रम , क्वचित.